


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद

दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..

संपर्क

कराड-२२७७२५/७३५०६४२३९४

सातारा कार्यालय-९२२६३९८८१७

वर्ष २८ वे | अंक १७१ | पाने ४ | मंगळवार | दि.२२ ऑक्टोबर २०२४ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# शिवसेना-काँग्रेस वादावर शरद पवारांची मध्यस्थी

## आज होणार यादी जाहीर:पवारांची काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी:-**

विधानसभा निवडणुकांच्या घोषणेनंतर राज्यात महाविकास आघाडी व महायुती यांच्यातील जागावाटपावर अद्याप अंतिम निर्णय झाला नाही. त्यामुळे, विधानसभा उमेदवारांची यादी जाहीर करण्यास सर्वच प्रमुख राजकीय पक्षांकडून उशीर होत आहे. त्यात, भाजपने आघाडी घेतली असून ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यानंतर, आजच अजित पवारांच्या राष्ट्रवादीची पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. मात्र, दुसरीकडे महाविकास आघाडीतील एकही यादी अद्याप जाहीर झाली असून शिवसेना-काँग्रेसमध्ये काही जागांवरुन जागावाटप अडून बसल्याचं समजतं. मात्र, शरद पवारांच्या मध्यस्थीने अखेर काँग्रेस-शिवसेनेत हातमिळवणी झाली आहे. त्यामुळे, महाविकास आघाडीच जागावाटपाचं गणित ठरलंय. त्यानुसार उद्या महाविकास आघाडीचे जागा वाटपाचे सूत्र निश्चित होणार असून लवकरच पहिली यादी जाहीर होईल.

महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये विदर्भातील जागांवरुन मतभेद होते. विदर्भातील काही जागांवर शिवसेना ठाकरे गटाकडून दावा केला जात होता, तर काँग्रेसही या जागा सोडण्यास तयार नाही. त्यामुळे, दोन्ही पक्षातील वाद चिघळल्याचं पाहायला मिळालं. मात्र, आता दोन्ही पक्षांतील जागावाटपावर दिल्लीतून मार्ग निघाला आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी मध्यस्थी करत विदर्भातील वाटपाचा तिढा सोडवला असून आजच्या आज महाविकास आघाडीचे नेते हा विषय संपुष्टात आणणार आहेत. विशेष म्हणजे आज-



उद्यामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या याद्या जाहीर केल्या जाणार आहेत.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे वादावर शरद पवारांनी मध्यस्थी केली. त्यासाठी, आदित्य ठाकरे आणि अनिल परब यांनी रविवारी शरद पवार यांची भेट घेऊन जागावाटपातील काँग्रेसच्या भूमिकेबद्दल माहिती दिली. त्यानंतर

पान ४ वर

# खेड शिवापूर टोलनाक्यावर ५ कोटी रुपये पोलिसांनी पकडले

**पुणे/प्रतिनिधी:-**

राज्यात निवडणुकीच्या अनुषंगाने ठिकठिकाणी भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली असून, संशयास्पद वाटणाऱ्या वाहनांची पोलिसांकडून झडती घेतली जात आहे. याच अनुषंगाने पुणे-सातारा महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्यावर आज सायंकाळच्या सुमारास एका वाहनामधून काही रक्कम नेण्यात येत असल्याची माहिती राजगड पोलिसांना मिळाली. त्यानुसार राजगड पोलिसांनी संबंधित वाहनाची झडती घेतली असता त्या वाहनामध्ये तब्बल ५ कोटी रुपयांची रोख रक्कम पोलिसांना मिळून आली आहे. तसेच सदर वाहन हे सत्तेतील एका बड्या आमदाराचे असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

सदर रक्कम आणि इनोव्हा क्रिस्टा कंपनीचे चारचाकी वाहन क्रमांक एमएच ४५ एएस २५२६ पोलिसांनी कारवाईत हस्तगत केले असून, घटनास्थळी पोलीस प्रशासनातील अधिकारी वर्ग तसेच तहसिदार, प्रांतअधिकारी आदी दाखल झाले आहे. तसेच आयकर विभाग, फाईंग स्कॉड देखील भेट देणार असल्याची माहिती मिळत आहे. सदर वाहनात चारजण असल्याची माहिती असून, यातील एकजण संबंधित



आमदाराचा नातेवाईक असल्याची माहिती मिळत आहे. राजगड पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

# शहिद जवान अमर पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**वाई/प्रतिनिधी:-**

छत्तीसगडमधील नारायणपूर कॅम्पमध्ये नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भूसरुंगाचा स्फोट होऊन चार जवान जखमी झाले.त्यामध्ये अमर पवार यांचा समावेश होता.जखमी जवानांना सैन्य दलाने कस्तुरमेटा कॅम्पमधून हेलिकॉप्टरच्या साह्याने उपचारासाठी रायपूरला दाखल केले होते.मात्र,उपचारा दरम्यान अमर पवार शहीद झाल्याचे वृत्त बावडा गावात धडकताच खंडाळा तालुक्यावर शोककळा पसरली.त्यांच्या पश्चात आई वडिल,भाऊ, पत्नी,एक मुलगा असा परिवार आहे.

शेतकरी कुटूंबात जन्मलेले अमर पवार यांचे प्राथमिक शिक्षण बावडा येथे तर पुढील शिक्षण खंडाळा येथे झाले असून सन २०१० मध्ये सैन्य दलात भरती झाले होते.एक तपापेक्षा अधिक काळ सैन्यात सेवा बजावणारे जवान अमर पवार छतीसगडमध्ये कार्यरत होते.

जवान अमर पवार शहीद झाल्याची माहीती मिळताच कुटुंबीय,मित्र परिवार गहीवरून गेला.पार्थिव केव्हा येईल या बाबत प्रतिक्षा लागून राहिली होती.यावेळी पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना चौकात,पारावरील उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या होत्या. दरम्यान,जवान अमर पवार यांच्यावर सकाळी पारगाव,खंडाळ्यात पुष्पवृष्टी करित आदरांजली वाहण्यात आली. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी केली होती.

त्यानंतर जवान अमर पवार यांचे पार्थिव त्यांच्या मुळ घरी आणण्यात आले.याप्रसंगी कुटूंबियांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.निवासस्थाना जवळ शहीद जवान



पवार यांचे उपस्थितांनी दर्शन घेतल्यानंतर फुलांनी सजविलेल्या वाहनातून रामनगरमधून सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास अंत्ययात्रा सुरू झाली.गावातील चावडी चौकातून पुढे

पान ४ वर

# धैर्यशील कदम यांना कराड उत्तरची उमेदवारी द्या

## कराड उत्तर भाजप पदाधिकाऱ्यांची मागणी

**कराड/प्रतिनिधी:-**

कराड उत्तर मतदार संघात भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांच्या माध्यमातून कोट्यवधीचा विकासनिधी प्राप्त झाला आहे. लोकसभा निवडणुकीत कराड उत्तरमधून श्री.छ.खा.उदयनराजे भोसले यांना भरघोस मतदान झाले आहे. शिवाय जिल्हाध्यक्ष म्हणून कदम यांनी या मतदार संघात चांगले संघटन बांधले आहे, त्यामुळे कराड उत्तरची उमेदवारी त्यांनाच द्यावी, अशी मागणी कराड उत्तर भाजप पदाधिकार्यांनी केली आहे.

कराड उत्तर भाजप पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पदाधिकार्यांनी ही मागणी केली आहे. यावेळी कराड रहिमतपूर मंडल अध्यक्ष भीमराव पाटील,कराड उत्तर मंडल अध्यक्ष शंकरराव शेजवळ, सागर



शिवदास, संपतराव माने, बाजार समितीचे संचालक राजेंद्र चव्हाण, पृथ्वीराज निकम, लाडकी बहीण योजनेच्या तालुका अध्यक्षा दीपाली खोत, कराड उत्तर महिला आघाडी मंडल अध्यक्षा सीमाताई घार्गे, महेश घाडगे, उपाध्यक्ष नविन जगदाळे, युवा मोर्चा अध्यक्ष श्रीकांत पिसाळ, विलास आघोळे, अविनाश साळुंखे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

भीमराव पाटील म्हणाले, २००७ पासून धैर्यशील कदम यांचा कराड उत्तर मतदार संघात जनसंपर्क आहे. २००९ च्या निवडणुकीत त्यांनी खा.उदयनराजे भोसले यांच्या सांगण्यावरून डॉ.अतुल भोसले यांना पाठिंबा दिला होता. २०१३ ते २०१४ मध्ये १५० कोटी निधी मतदार संघातील प्रत्येक गावात आणला होता. भाजपाचे जिल्हाध्यक्ष म्हणून सातारा लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री.छ.खा.उदयनराजे भोसले यांना निवडून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. कदम यांना खा.उदयनराजे भोसले यांच्यासह आ.शिवेंद्रराजे भोसले, आ.जयकुमार गोरे, डॉ.अतुल भोसले, विक्रम पावसकर यांचा पाठिंबा आहे. त्यामुळे धैर्यशील कदम यांना कराड उत्तरमधून उमेदवारी मिळावी, अशी मागणी पदाधिकार्यांनी यावेळी केली.

पत्रकार परिषदेनंतर धैर्यशील कदम यांनी पत्रकारांशी संवाद साधला ते म्हणाले, भाजपाच्या पहिल्या यादीत आ.शिवेंद्रराजे भोसले, आ.जयकुमार गोरे, डॉ.अतुल भोसले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. दोन जागेसाठी शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्याशी चर्चा सुरू आहे. उत्तर मतदार संघ भाजपाला मिळावा अशी भाजप पदाधिकार्यांची मागणी आहे. कराड दक्षिण व उत्तर दोन्ही ठिकाणी कमळ चिन्ह असेल तर विजय सोपा होईल यासाठी उत्तर भाजपाला सोडावा अशी आग्रही मागणी पक्षश्रेष्ठींकडे करण्यात आली आहे.

# कश्मीरा पवारला सातारा पोलिसांनी केली अटक

## १४ कोटींच्या फसवणूक प्रकरणी अटक

**सातारा/प्रतिनिधी:-**

पंतप्रधान कार्यालयाची कायदेशीर सल्लागार बनवणारी कश्मिरा पवार तिला सुमारे १४ कोटींच्या फसवणूक प्रकरणी सातारा शहर पोलिसांनी अटक केली आहे तिच्यासोबत अन्य सात जणांना ही अटक करण्यात आली आहे.

पंतप्रधान कार्यालयाची कायदेशीर सल्लागार म्हणून मिरवत असलेली कश्मिरा पवार हिने साताऱ्यासह पुणे कराड कोल्हापूर आदी ठिकाणी नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याच्या तक्रारी सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या होत्या त्यानुसार काही दिवसांपूर्वीच तिला अटकही करण्यात आली होती मात्र त्यानंतर जामिनावर सुटून तिने पुन्हा एकदा लोकांना फसवण्याचा हातखंडा वापरण्यास सुरुवात केली.

अशाच एका खामकर पुणे येथील सुष्मा खामकर नावाच्या महिलेस महाराष्ट्रातील शाळांना गणवेशाचे टेंडर मिळवून देते असे सांगून तिच्याकडून सुमारे १४ कोटी रुपये तिने घेतले मात्र प्रत्यक्षात कोणतेही टेंडर न देता तिची आर्थिक फसवणूक केली आहे . खामकर या महिलेची काश्मिरा सोबत अनिल वायदंडे याच्या माध्यमातून ओळख झाली होती .याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर कश्मिरा संदीप पवार , गणेश हरिभाऊ गायकवाड, युवराज झळके, राधा युवराज झळके, अनिल वायदंडे ( मयत ) अनिता जाधव, दशरथ जाधव, अमित भरत वायदंडे सह सात लोकांना अटक करण्यात आली हा गुन्हा नोव्हें २०१९ ते डिसेंबर २०२२ या दरम्यान घडला आहे . गुन्ह्यात फसवणुकीची रक्कम १४ कोटी ७३ लाख ४० हजार ४८५ रुपये इतकी आहे . कश्मिरा हिमे पाच कोटी रुपयांची बनावट टेंडर प्रत खामकर यांना दिल्याने त्यांना विश्वास झाला होता मात्र प्रत्यक्षात असे कोणतेही टेंडर नसल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले.

# उंब्रज येथील कॉलेजकुमार कारवाईच्या कचाट्यात

## दुचाकी वाहनचालक अल्पवयीन विद्यार्थ्यांसह पालकांना पोलिसांची तंबी

**उंब्रज/प्रतिनिधी:-**

उंब्रज ता.कराड येथील शाळा कॉलेज परिसरात दुचाकीवरून शायनिंग करणाऱ्या अल्पवयीन मुलांना वाहन चालवत असताना कोणताही वैध परवाना सकृतदर्शनी दिसून आला नसल्याने उंब्रज पोलिसांनी कारवाईच्या कचाट्यात पकडले आहे नियमानुसार पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालवायला देत असताना काही बंधने पाळायला हवीत परंतु मुलाला गाडी दिली की काम झालं असे म्हणून पालक आपली मूले गाडी घेऊन कॉलेजला गेल्यावर काय करतात याचेही भान राखत नाहीत.यामुळे वाहनांसहित पकडलेल्या सर्व मुलांना पालकांना बोलावून घेऊन पोलिसांनी त्यांचे समुपदेशन केले तसेच नियम काय आहेत याबाबतीत माहिती दिली यावेळी सूचना देऊन सोडले असले तरी भविष्यात असा प्रकार पुन्हा घडल्यास कठोर कारवाई पालकांवर केली जाईल असा सज्जड दम पोलिसांनी दिला आहे.सदरची कारवाई सोमवार दि.२१ रोजी सकाळी ११ वाजनेच्या दरम्यान कॉलेज सुटतेवेळी सपोनि रवींद्र भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

याबाबतीत घटना स्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार सकाळी कॉलेज सुटतेवेळी काही रोड रोमियो कॉलेजच्या नावाखाली टंगळमंगळ करीत असल्याची माहिती उंब्रज पोलिसांना मिळाली होती या अनुषंगाने धडक कारवाई राबवत घुटमळणारे काही युवक पोलिसांच्या कारवाईच्या टापूत आले यामधील अनेक मुले ही अल्पवयीन असल्याचे पोलिसांनी सांगितले या मुलांच्या पालकांना शाळेत बोलावून त्यांना कायदा काय आहे याची समज देण्यात आली तसेच पुढील वेळी कठोर कारवाई होणार असल्याची तंबी देण्यात आली.



**महात्मा गांधी विद्यालय परिसरात कारवाई करताना पीएसआय रमेश ठाणेकर ,कोमल पाटील पोलीस कॉन्स्टेबल मयूर थोरात,हेमंत पाटील ,श्रीधर माने ,महिला पोलीस कॉन्स्टेबल नीलम जाधव (छाया अनिल कदम ,उंब्रज)**

महात्मा गांधी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय उंब्रज येथे आज दिनांक दि.२१ रोजी प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उंब्रज पोलीस स्टेशनचे पीएसआय रमेश ठाणेकर यांनी पोलीस कॉन्स्टेबल ट्राफिक हेमंत पाटील, श्रीधर माने, मयूर थोरात ,महिला पोलीस कॉन्स्टेबल नीलम जाधव यांनी विद्यालयाच्या आवारामध्ये दुचाकी घेऊन येणाऱ्या हुलडबाजी करीत विना परवाना तसेच हेल्मेट न वापरता दुचाकी वाहन चालवणाऱ्या वर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे १६ केसेस मध्ये एकूण दंड १०५०० करण्यात आला आहे.

## स्टायलिश ड्रेस आणि बरच काही.....

कानात बाळी, पॅन्ट आखडलेली, मांडीवर स्टाईलनुसार पॅन्ट फाटलेली,पायात काळा धागा बांधलेला,हातावर गोंदलेले टॅटू,लव्ह बँड मनगटात शाळा कॉलेज आहे का फॅशन शो अशी बघणाराची अवस्था होत आहे.यामुळे शिक्षक वर्गाने सुद्धा काही जबाबदारीचे भान ठेवणे गरजेचे असून मुलांना योग्य त्या ड्रेस कोडसह गळ्यात शाळा किंवा कॉलेजचे आयडेंटिटी कार्ड असणे बंधनकारक करणे महत्त्वाचे असून याच वयात जर योग्य सवयी लागल्या नाहीत तर भविष्यात मुलांना समाजात वावरताना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.यामुळे या शाळेतील मुले मुली आज देशात परदेशात उच्च पदावरकार्यरत आहेत एकेकाळी शाळेच्या आवारात विद्यार्थी घुटलमळताना दहावेळा विचार करीत असत आज मात्र परिस्थिती बदलली असल्याची पालक वर्गात चर्चा आहे.

## गठबंधन..

आवश्यक गठबंधन
जरुरत म्हणून कधी
एकमेकांची अंतर्मने
जाणून घ्यावी आधी
टाळावेअसले विषय
जिथे दिसे वादावादी
धुसफूस माजवण्या
लावतीलं काहीनादी
कमालसमान विचार
एक दुस-यांस सांधी
जोडले अनोखे बंधन
गोष्ट असे सरळसाधी
संगम होणारं पवित्र
संम्मिलीत एकत्र नदी
नियमअटी जाणाव्या
पार पडो सर्वं सविधी
जाणे पत्रिका सर्वांची
जमवण्याआधी शादी
नकोअसह्य तडजोडी
मिळवण्यासाठी गादी
जोखून घ्या साथीदार
टाळावी घिसाड गर्दी
हवा बदलता जराशी
निसटून जातीलं अर्धी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कराड दक्षिण मतदारसंघात पुन्हा इतिहास घडवूया

## आ.पृथ्वीराज चव्हाण:कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाच्या कार्यकर्ता निर्धार मेळाव्यास अभूतपूर्व प्रतिसाद

**कराड/प्रतिनिधी:-**

निवडणुकीत पैशाचा वारेमाप वापर होईल. कोणी खोटी आश्वासने देवून निघून जाईल. पण माझा तुमच्यावर विश्वास आहे. तुमच्या आशीर्वादाने मी खासदार, केंद्रीय मंत्री व मुख्यमंत्री झालो. हे मी कधीच विसरणार नाही. विधानसभा निवडणुकीत प्रत्येकाने आपला बूथ सांभाळावा, व आपला बूथ जिंकावा. राज्यात आघाडीचे सरकार येणार, ही काळ्या दगडावरील खूण आहे. त्यामुळे प्रत्येक गावाचा विकास आराखडा तयार करा. तो पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. कराडचा ऐतिहासिक विकास करण्यासाठी आम्हाला साथ द्या. आणि पुन्हा कराड दक्षिण मतदारसंघात इतिहास घडवूया, असा निर्धार राज्याचे माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ता निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. उदयसिंह पाटील - उंडाळकर, प्रदेश काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, कराड दक्षिण राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मनोहर शिंदे, उत्तरचे अध्यक्ष निवासराव थोरात, अजितराव पाटील - चिखलीकर, युवा नेते इंद्रजित चव्हाण, प्रा. धनाजी काटकर, पैलवान नानासाहेब पाटील, जयवंतराव उर्फ बंडानाना जगताप, शिवाजीराव मोहिते, ॲड. नरेंद्र नांगरे - पाटील, प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवराज मोरे, कराडच्या माजी नगराध्यक्षा अर्चना पाटील, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटवेकर, प्रदीप जाधव, मलकापूरच्या माजी नगराध्यक्षा नीलम येडगे, गितांजली थोरात, शंकरराव खबाले, रोहित पाटील, नामदेव पाटील, कराड शहर काँग्रेसचे अध्यक्ष ऋतुराज मोरे, नितीन थोरात, एकनाथराव तांबवेकर, डॉ. सुधीर जगताप, उदय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, कराडचा आजचा निर्धार राज्यात पोहचला आहे. ही निवडणूक आणि आजचा निर्धार राज्याच्या भवितव्याकरिता महत्वाचा आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार आणि शिवाजी महाराजांचा आदर्श कराड दक्षिण मतदारसंघाने आजपर्यंत जपला आहे. १९९१ साली माझ्यावर कराडकरांनी विश्वास दाखवला. त्यामुळे मला तीनवेळा खासदार होता आले. व मला पंतप्रधान कार्यालयापर्यंत मानाचे काम करता आले. मुख्यमंत्री असताना चार वर्षात कराड दक्षिणमध्ये १८०० कोटीची विकासकामे आणली. दहा वर्षे



**कराड : येथील कार्यकर्ता निर्धार मेळाव्यात बोलताना आ. पृथ्वीराज चव्हाण, समोर उपस्थित जनसमुदाय. छाया-अस्लम मुल्ला**

ती कामे सुरू होती.

ते म्हणाले, गेल्या दहा वर्षात भाजपने द्वेषाचे राजकारण करत सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान केले आहे. आजपर्यंत या लोकांनी आपल्याला छळले आहे. महाराष्ट्राचा विकास खुंटला आहे. अनेक मोठे प्रकल्प

पान ४ वर

> एका डोळ्याच्या बदल्यात एक डोळा हे संपूर्ण जग अंध करेल. – महात्मा गांधी

# संपादकीय

## जरागेंचा इशारा

महाराष्ट्रात मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य झालेली नाही. आपल्या मागणीसाठी त्यांनी अनेकदा उपोषणे केली. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी आपली मागणी मान्य होईल, अशी अपेक्षा त्यांना होती. परंतु, सरकारने त्यांचे समाधान होईल, असा कोणताही निर्णय घेतला नाही. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी त्यांनी घेतलेल्या दसरा मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद लाभला होता. त्यामुळे समाज आपल्या पाठीशी असल्याची खात्री त्यांना झाली. या मेळाव्यात विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाची भूमिका काय असेल, ते घोषणा करतील, अशी एक अपेक्षा होती. मराठा समाजालाही तीच अपेक्षा होती. परंतु, त्यांनी २० ऑक्टोबर रोजी भूमिका स्पष्ट करणार असल्याचे मेळाव्यातून सांगितले होते. त्यामुळे २० ऑक्टोबरकडे लक्ष वेधले गेले होते. ठरल्याप्रमाणे जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमध्ये घेतलेल्या मराठा समाजाच्या बैठकीत त्यांनी अनेकांची मते जाणून घेतली. बैठकीत हात वर करुन निवडणुकीमध्ये उमेदवार उतरायचे की नाही? असे विचारत त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतरच निवडणुकीत उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्या ठिकाणी आपले उमेदवार निवडून येतील त्या ठिकाणी उमेदवार द्यायचे, असा एक निर्णय त्यांनी जाहीर केला. राखीव म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या मतदारसंघात आपल्या विचाराचा उमेदवार असेल, तर त्याला पाठिंबा द्यायचा किंवा मदत करायची, हा एक दुसरा निर्णय आहे. याचा अर्थ बिनराखीव मतदारसंघात जरांगे यांच्या विचाराचे उमेदवार असतील. पण, सर्वच मतदारसंघात उमेदवार असतीलच असे नाही. ज्या मतदारसंघात निवडून येण्याची खात्री आहे, त्याच मतदारसंघात उमेदवार दिले जाणार आहेत. ज्या मतदारसंघात मराठा समाजाची ताकद जास्त आहे किंवा मराठा मतदार जास्त आहेत, त्याच मतदारसंघांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. जेथे उमेदवार दिले जाणार नाहीत तेथे काय भूमिका घ्यायची, हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. जरांगे यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असलेला राग लक्षात घेता जरांगे समर्थक मराठा मतदारांचा कल महाविकास आघाडीकडे जाऊ शकतो. सरकारने मागणी मान्य न केल्याने त्यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याचा इशारा दिला होता. सत्ताधाऱ्यांचे आमदार निवडणुकीत पाडणार असल्याचाही इशाराही यांनी दिला होता. ज्या जागा महायुतीत शिवसेना (शिंदे). आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या वाट्याला असतील, तेथे मराठा समाज वेगळा विचार करू शकतो. पण, यामध्येही ओबीसी उमेदवार असतील, तर मराठा मतदार वेगळा विचार करू शकतो. राखीव जागांवर मराठा समाजातून उमेदवार देता येणे शक्य नसल्याने, अशा मतदारसंघांत आपल्या विचारांच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा निर्णय घेण्यात आला आहे. राखीव जागेवर आपल्या विचाराचा उमेदवार कोणत्याही पक्षाचा असला, तरी त्याला पाठिंबा द्यायचा पण त्या उमेदवाराकडून आपल्या मागणीला पाठिंबा देईल, असे ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेण्याची अट घालण्यात येणार आहे. ही अट मराठा समाजाची मते मिळविण्यासाठी कोणी मान्य करेल काय? हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, या मागणीला पाठिंबा दिला, तर ओबीसी मतांना त्या उमेदवारास मुकावे लागण्याची तितकीच शक्यता आहे. बिनराखीव मतदारसंघात उमेदवार देताना परिस्थिती पाहून ते निर्णय घेणार आहेत. आपला उमेदवार कोणत्या मतदारसंघामधून निवडून येऊ शकतो? तसेच कोणत्या मतदारसंघात मुस्लिम–दलित एकत्र आहेत, याचा आढावा ते घेणार आहेत. त्यांनी आपल्या समर्थकांना उमेदवारी अर्ज भरुन ठेवण्यास सांगितले आहे. अर्ज मागे घ्यायच्या दिवशी ते निर्णय घेणार आहेत. समर्थकांना त्यांनी तयारी करण्यास सांगितले आहे. निवडून येण्याची क्षमता आणि मतदारसंघात समाजाची ताकद याचा विचार विचारही जरांगे यांना करावा लागणार आहे. याशिवाय उमेदवार मतदारांना परिचितही असला पाहिजे. केवळ मराठा समाजाच्या ताकदीवर उमेदवार निवडून येईल, याची खात्री नसल्याने जरांगे यांनी मुस्लिम आणि दलित समाजाला जवळ करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. तसा तो करणारही आहेत. गेल्या काही दिवसांपासून जरांगे हे मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी सरकारकडे करत आहेत. मात्र, त्यांची मागणी सरकारने मान्य न केल्याने त्यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याचा इशारा दिला होता. तसेच सत्ताधाऱ्यांचे आमदार निवडणुकीत पाडणार असल्याचाही इशाराही दिला होता. त्यानंतर अखेर त्यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उतरवण्याची घोषणा केली. जरांगे पाटील यांनी बैठकीत मराठा समाजाला हात वर करुन निवडणुकीमध्ये उमेदवार उतरायचे की नाही? असे विचारत त्यांची मते जाणून घेतली आणि त्यानंतर उमेदवार निवडणुकीत उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठा जातीचे वर्चस्व असणारे राज्यात ७५ ते ८० मतदारसंघ आहेत. राखीव ५४ पैकी ३६ मतदारसंघात मराठा समाजाची ताकद आहे. याचा विचार करुन काही ठिकाणी उमेदवार निवडून आणायचे आणि काही ठिकाणी उमेदवार पाडायचे असा संमिश्र प्रयोग जरांगे पाटील करू पाहत असल्याचे दिसत आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे, याविषयी शंका नाही. तरीही त्यांचे आंदोलन मराठवाड्यात अधिक तीव्र स्वरुप धारण करत असते. देश स्वतंत्र झाला तेव्हा मराठवाड्यात निजामाची राजवट होती. या राजवटीत मराठा समाजाच्या नोंदी वेगळ्या स्वरुपात होत्या. मराठा–कुणबी आणि कुणबी–मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रवर्गाचा दाखला मिळण्यात अडचणी येत होत्या. ही अडचण महायुती सरकारने बऱ्याच प्रमाणात दूर केली आहे. मंडल आयोग लागू झाल्यानंतर मराठवाडा वगळता उर्वरीत महाराष्ट्रात कुणबी नोंद असलेल्यांनी आपला प्रवेश ओबीसीत करवून घेतला. याचा विचार करता हा प्रश्न मराठवाड्यात तीव्र आहे. म्हणूनच मराठवाड्यातच जरांगे काही करामत करू शकतात. मराठवाड्यातील विधानसभा मतदारसंघांवर त्यांचे लक्ष असेल, असे दिसत आहे. सर्वच पक्षांमध्ये मराठा समाजाचे नेते आणि कार्यकर्ते आहेत. याचाही विचार मराठा समाजाला करावा लागणार आहे. पण, मराठा समाजाची दाखवून देण्याचा प्रयत्न या निवडणुकीत मनोज जरांगे पाटील करू पाहत आहेत.

# विषारी दारूचे बळी



**श्याम ठाणेदार**
**पुणे**

बिहार मध्ये विषारी दारू पिऊन चाळीस पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. विषारी दारू पिऊन मृत्युकांड घडल्याची ही देशातील पहिली वेळ नाही तर अशा अनेक घटना याआधी देशात घडल्या आहे. दरवर्षी अशी एखादी तरी घटना घडतेच. सहा महिन्यापूर्वीच तामिनाडूमध्ये अशी दुर्दैवी घटना घडली होती. मागील पूर्वी पंजाबमध्ये विषारी दारू पिऊन ९० लोकांचा बळी गेला होता. बिहार राज्यातील तर अशा अनेक घटना घडल्या आहेत. दोन वर्षापूर्वी बिहारमध्येच विषारी दारू पिऊन ३६ जणांना जीव गमवावा लागला होता. बिहार हे राज्य तर विषारी दारू साठीच प्रसिद्ध आहे की काय अशी शंका आता येऊ लागली आहे कारण विषारी दारूचे सर्वाधिक बळी हे बिहार राज्यातच गेले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये बिहार मध्येच विषारी दारू पिल्याने ७२ जण दगावले होते. मार्च २०२२ मध्ये १२ जण तर नोव्हेंबर २०२१ मध्ये ४२ जणांचा बळी गेला होता. आताही तिथेच पुन्हा ही दुर्दैवी घटना घडली आहे. मागील घेटनेतून कोणताही बोध न घेतल्यानेच अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होत आहे. विशेष म्हणजे बिहार राज्यात संपूर्ण दारू बंदी आहे. विषारी दारुकांडात ४० हून अधिक लोकांचा बळी गेल्यावर नेहमीप्रमाणे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यासाठी एस आय टी नेमून संपूर्ण घटनेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची घोषणा त्यांनी केली पण यातून विशेष काही हाती लागेल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमणे ही आपल्या देशात नित्याची बाब आहे. पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा झाली तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादित करून ती विकली जात असताना बिहार सरकार आणि तेथील पोलीस यंत्रणा काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारुमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकत होते अशी माहिती समोर आली आहे. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथाईल अल्कोहोल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत. हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. आपल्या देशात विना परवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला देखील माहीत असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचे देखील हात आधीच ओले केले असल्याने ते त्याकडे काणाडोळा करतात त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरिओम होतो. दारू माफिया व पोलीस प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने बिहार पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली मात्र ही अटक केवळ दिखाव्यापुरती आहे. छोट्या माशांना अटक करून बिहार पोलीस कारवाईचा दिखावा करत आहेत. मोठे मासे म्हणजे दारू माफियांना गजाआड करण्याचे धाडस बिहार पोलीस दाखवू शकत नाही. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही त्यांना भान नसते. दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासन स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.



# प्रि-वेडिंग शुट चांगले की वाईट?

**सौ.मीनल उनउने**
**सातारा**

माझी मैत्रीण मुग्धा –बरोबर संसारात रममाण होती. त्यांच्या दोन्ही मुली लग्नाच्या वयाच्या झाल्या होत्या. गिरीजा आणि सायली. दोघीही सालस, सुसंस्कारित, दिसायला एकदम छान. थोरली गिरीजा आयटी कंपनीत जॉबला तर सायलीने एम कॉम पुर्ण करुन बॅंकिंग च्या स्पर्धा परिक्षेत डोकं घातलेलं.

गिरीजाला स्थळं येऊ लागली. सुट्टीच्या दिवशी हाच कार्यक्रम ठरला होता – स्थळं पाहणे. मुलाकडील मंडळी घरी बोलावणे आणि पाहूणचार करणे. रविवारची सुट्टी अशी ठरल्यातच जमा होती. असे करता – करता एका स्थळाची पसंती झाली. एकमेकांची पसंती झाली. पावसाळ्याचे दिवस सुरु असल्याने दिवाळी नंतरचा मुहूर्त काढण्याचे ठरले. तोपर्यंत साजेलसा साखरपुडा करण्यात आला. आता काय हळूहळू फोनवरच्या गप्पा सुरू झाल्या. ऑफिसला जाताना – येताना यांचे फोन कॉल्स सुरूच असत.

मुग्धा व सतिश यांच्या मनात विचार आला की सायलीचेही लग्न जमले तर बरे होईल. दोघींचेही एकाच हॉलमध्ये करता येईल. सर्वच गोष्टी जुळून आल्या तर बरे होईल. सर्वच दृष्टीने सोयीचे होईल. आणि काय योगायोग. पाहूण्यांपैकी एकाने सायलीसाठी स्थळ सुचविले आणि सर्वांच्या संमतीने बघण्याचा कार्यक्रम देखील करण्यात आला. समोरासमोरच पसंती देखील झाली.

मुग्धा व सतिश यांनी गिरीजाकडील पाहूण्यांना एकत्र लग्नाविषयी विचार मांडले. त्यांचीही एकत्र लग्न समारंभाकरीता काहीच हरकत नव्हती. हळूहळू तिन्ही घरी तयारी सुरू झाली. डिसेंबर मधील लग्नाची तारीख ठरली. त्यानुसार हॉल बुकिंग, केटरर्स, डेकोरेटर्स या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्यात आले.

आता अलिकडेच निघालेल्या नविन फॅशन नुसार प्रि – वेडिंग शुट करीता गिरीजाच्या सासरकडील मंडळींनी सुचविले. त्यानुसार गिरीजाचा होणारा नवरा साहिल याने गिरीजास काही लोकेशन्स देखील सांगितली. आता गिरीजाचे प्रि – वेडिंग शुट होणार म्हटल्यावर सायली आणि निखील या दोघांचेही तसे ठरले.

लग्नाला आणखी दोन महिने अवधी होता. दिवाळी सणाला जोडूनच चौघांनीही ४–५ दिवसांच्या सुट्ट्या घेतल्या. प्रि – वेडिंग शुटसाठी दापोली व गोवा याठिकाणी शुट करण्याचे ठरले. ४–५ मित्र – मैत्रिणींसह सर्वजण अगोदर पोहोचले ते गोव्यामध्ये. लेडीज व जेन्ट्स यांचेसाठी वेगवेगळ्या रूम्स घेण्यात आल्या. गोव्यातील बीचवर व इतर ठिकाणी शुटिंग करून दापोलीला उर्वरित शुटिंग करण्यात आले. तिथेच सर्वांच्या सुट्ट्या संपल्या.


प्रि – वेडिंग शुटमुळे होणारे नवरा – नवरी खुपच खुश होते. थोडंसं जवळून न्याहाळायची, समजून घ्यायची संधी चौघांनाही मिळाली होती. त्यामुळे फोनवरच्या गप्पांचा ओघ आणखीनच वाढला होता. मात्र; गिरीजा अधूनमधून अपसेट वाटू लागली. मनापासून बोलत नसल्याचे जाणवू लागले. एके रविवारी दोघं डिनरला गेली असता दोघांच्या मध्ये खुपच वादावादी झाली. आणि दोघांनीही टोकाचे निर्णय घेऊन मोकळे झाले. दोन्हीकडील घरच्यांनी एकमेकांना समजवण्याचा खूप प्रयत्न केला. पण, सर्वकाही व्यर्थ. गिरीजा व साहिल यांनी एकमेकांना नकार दिला. आणि तिथेच दोघांचे लग्न मोडले. लग्न तर आता एक महिनाच लांब होते. मुग्धा व सतिशला खूप वाईट वाटले. सायली पण लग्नाला तयार होईना. तिने निखिलला सर्व सांगून लग्न पुढं ढकलूया असे सांगितले. निखील व त्याच्या घरचे तयार झाले. पण; गिरीजाने सायलीची समजूत काढली. मुग्धा व सतिशनेही तिला समजून सांगितले. आणि मग सायली तयार झाली.

प्रश्न उरतो तो प्रि – वेडिंग शुटिंगचा. त्याचे काय करायचे? शुटिंगची सीडी तोडता येईल. अजून ती पुर्ण तयार व्हायची होती. पण; तुटलेल्या मनांचे काय? तुटलेल्या नात्यांचे काय? मनात शुटिंगच्या आठवणी तर येणारच ना!

पण; त्याचवेळी सायली आणि निखील या दोघांचीही मनं चांगली जुळली होती. प्रि – वेडिंग शुटिंगच्या वेळी दोघांनी गप्पांमधून एकमेकांच्या आवडीनिवडी, विचार जाणून घेतले होते. शिवाय एकमेकांच्या कुटूंबातील समस्यांविषयीही आपूलकी निर्माण केली होती. आणि त्यादृष्टीने ते पाहतही होते.

गिरीजा आणि साहिल मात्र एकमेकांच्या मनावर विचार लादत राहिले आणि एकमेकांना समजून घेण्यात अपयशी ठरले. कदाचित हिच घटना लग्नानंतर घडली असती तर संसार मोडला असता, आणखी काही विपरीत झाले असते. पण; जर का असा विचार केला असता तर की; आता आपले लग्न झाले आहे घेऊया सांभाळून. कदाचित असेही होऊ शकले असते. पण; या जर – तर च्या गोष्टी कोण जाणे?

प्रि – वेडिंग शुट एकाच घरातील एकीसाठी फायद्याचे ठरले तर एकीसाठी नुकसानीचे. आणि जर हे प्रि – वेडिंग शुट झालेच नसते तर? या प्रि – वेडिंग शुटमुळे सायली व निखील सारख्या अनेक जोडप्यांची मने जुळताहेत. त्यांच्या विचारांची देवाणघेवाण होतेय. कदाचित या गोष्टी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मार्गदर्शकही ठरतील. पण; गिरीजा व साहिल यांच्या सारख्यांचे काय? सगळेच असे असणार नाहीत. सर्वांनाच प्रवाहाबरोबर जायचे असते. हौस – मौज करा पण; त्याबरोबर काय चुक काय बरोबर हे देखील शिकायचे असते. सर्वकाही व्यवस्थितच होईल.





# समताधिष्ठित समाज व्यवस्था टिकण्यासाठी बंधुतेची गरज

## डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन; विश्वबंधुता साहित्य परिषदेतर्फे रयत विचारवेध संमेलन

**पुणे/प्रतिनिधी:** समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची दारे खुली व्हावीत, त्यातून समताधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समता व बंधुतेचा विचार घेऊन रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गोरगरिबांना सन्मान दिला. ही समताधिष्ठित समाज व्यवस्था भविष्यातही टिकून राहावी, यासाठी बंधुतेची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.



बंधुता लोकचळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयत विचारवेध संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. नवी पेठेतील पत्रकार भवनात झालेल्या कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, उद्घाटक रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, कवयित्री ललिता सबनीस, स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. अरुण आंधळे, विद्यार्थी शिक्षक साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. सविता पाटील, कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, साहित्यिक प्रा. शंकर आथरे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच सबनीस यांच्या हस्ते डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. अरुण आंधळे, डॉ. सविता पाटील, चंद्रकांत वानखेडे, शंकर आथरे, संगीता झिंजुरके आणि जनसंपर्क व पत्रकारितेतील योगदानाबद्दल जीवराज चोले यांचा संविधान देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, स्वार्थाच्या राजकारणापायी समाज तुटत चालला आहे. माणूस जातीधर्माच्या, वर्णभेदाच्या चौकटीत विभागाला जात आहे. अशावेळी समाजाला एकसंध ठेवण्यासाठी बंधुत्वाची भावना जनमानसात रुजायला हवी. भाऊरावांनी शंभर वर्षांपूर्वी केलेले कार्य पुढे घेऊन जाण्याचे काम प्रकाश रोकडे करत आहेत. धर्मांधतेचे राजकारण आपण हणून पाडायला हवे. मतभेदांना दूर करून सामाजिक समरसता जोपासण्याचे काम बंधुतेचा विचार करतो. बंधुतेची ही चळवळ विश्वव्यापी होतेय, याचा आनंद वाटतो.

डॉ. शिवलिंग मेनकुदळे म्हणाले, समता आणि बंधुता जपणारा माणूस आपल्याला बनायचे आहे. शाहू महाराजांकडून ज्या पद्धतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रेरणा घेतली तशी प्रेरणा आपल्याला घयायची आहे. अशा महापुरुषांचा विचार जपण्यासाठी आज बंधुतासारख्या संस्थांची गरज आहे. पारंपरिक बुरसटलेल्या विचारांना छेद देऊन भाऊराव पाटलांनी जसे शिक्षणाला प्राधान्य दिले त्याप्रमाणे आज प्रत्येकाने शिक्षित होणे गरजेचे आहे. समाजात जर का सर्व बाजूनी परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षणाशिवाय याला पर्याय नाही.

बंधुताचार्य प्रकाश रोकडे म्हणले, छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहमीच रयतेचा विचार केला. आपल्याला लोकशाहीचे, मानवतावादाचे धडे त्या काळापासून दिले आहेत. मात्र अलीकडच्या काळात रयतेला जाती–धर्माच्या नावाने लढवले जात आहे. आरक्षणाच्या नावाखाली देशातील रयतेला एकमेकांसोबत झुंजत ठेवले जात आहे. ही गोंधळाची परिस्थिती निवारण्यासाठी हे रयत संमेलन आहे. आज प्रत्येकाच्या घरात संविधान असणे महत्त्वाचे आहे. साहित्यिकांनी अपप्रवृत्तीच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे.

प्रा. डॉ. अरुण आंधळे यांनी प्रास्ताविक केले. संगीता झिंजुरके यांनी अमोघ सूत्रसंचालन केले. रमेश पतंगे यांच्या सनई चौघडा वादनाने कार्यक्रमाला चांगलीच रंगत आली. प्रा. शंकर आथरे यांनी आभार मानले.

# कराड शेती उत्पन्न बाजार समिती, कराड

## बाजार भाव

### सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४

| | | | |
|---|---|---|---|
| **फळे** | | भोपळा- | ५० ते १०० |
| सिताफळ - | - | कारले- | २०० ते ३०० |
| चिकू - | २०० ते ३०० | फ्लॉवर- | २०० ते २४० |
| संफरचंद - | १००० ते १२०० | कोबी- | १०० ते १५० |
| मोसंबी - | ८०० ते १४०० | आले- | ३५० ते ५०० |
| डाळींब - | ५०० ते ७०० | सूरळ- | - |
| केळी - | १२० ते १६० | हिरवी मिरची- | २०० ते २५० |
| लिंबू - | - | शेवगा- | ८०० ते ९०० |
| **पालेभाज्या** | | चवळी शेंग | - |
| कोथंबीर - | ५०० ते १२०० | भुईमुग शेंगा- | - |
| मेथी - | ७०० ते १००० | पावटा- | ४०० ते ५०० |
| पालक - | ३०० ते ५०० | हिरवावाटाणा- | ७०० ते १००० |
| मुळा - | - | गवारी- | ३०० ते ४०० |
| तांदूळ - | - | घेवडा- | २०० ते ३०० |
| शेपू - | ४०० ते १००० | ढबू मिरची- | ४०० ते ४५० |
| **फळभाज्या** | | काकडी - | १०० ते १५० |
| दोडका - | २०० ते २५० | रताळ- | - |
| वांगी - | १०० ते २०० | पडवळ- | २०० ते २५० |
| टोमॅटो - | १५० ते २५० | कांदा- | २५० ते ३५० |
| भेंडी - | २०० ते ३०० | बटाटा- | २०० ते २७० |
| दूधी - | ८० ते १२० | लसून- | २००० ते ३००० |

टिप:- दर प्रति १० किलो/ शेकडा/ १० डझन

## बोधकथा

### ईश्वरदर्शनाची साधना

एक संसारी साधू होता. त्याच्याकडे एक खरा जिज्ञासू आला आणि म्हणाला, महाराज! आपल्याला ईश्वरदर्शन झाले आहे काय? साधू म्हणाला, ते मला माहीत नाही. पण ईश्वर माझ्याबरोबर असतो खरा. जिज्ञासू बोलला, आपणच काय साधना करता? साधूने उत्तर दिले, भूक लागली की मी खातो, झोप आली की मी निजतो. स्नान झाले की मी पांडुरंगाची पूजा करतो हीच माझी साधना जिज्ञासू म्हणाला, अहो या गोष्टी तर सगळे करतात त्यावर तो साधू ठसक्याने बोलला, नाही, नाही! सगळे असे करीत नाही. कसे ते पहा. मी जेवतो तेव्हा पांडुरंग जेवतो. मी निजतो तेव्हा पांडुरंग विश्रांती घेतो. मी पूजा करतो तेव्हा हृदयस्थ ईश्वराला आवळतो. अशा प्रकारे ईश्वरावाचून एक क्षणभर मी एकटा राहात नाही. यात त्याचे दर्शन होते का नाही ते तू पहा.

कथा उपदेश : ईश्वर आपल्याबरोबरच आहे असे गृहित धरून वागावे म्हणजे मग ईश्वरदर्शन होईल.

## (गुरुवचन)

### त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते.

यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक–परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात.

अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सर्वर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होणे असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखामध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# शिक्षक हा समाजाची सेवा करत असतो:आ.बाळासाहेब पाटील

**मसूर/प्रतिनिधी:-**

शिक्षक हा समाजाची सेवा करत असतो राजेंद्र चव्हाण सर यांनी २८ वर्षे सेवा करून पिढ्या घडवण्याचे काम केले आहे त्यांनी या पुढचा काळ गावाचा व भागाचा विकास करण्यासाठी व्यतित करावा असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब पाटील यांनी केले.

ते कालगाव ता. कऱ्हाड येथील राजेंद्र रामराव चव्हाण सर यांचा मसूर येथील अशवमेघ कार्यालयात आयोजित सेवानिवृत्ती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे बोलत होते यावेळी सातारा जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती मानसिंगराव जगदाळे, शरदचंद्र पवार गटाच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या संगीता साळुंखे, सह्याद्री कारखान्याचे संचालक लालासाहेब पाटील, निगडी विकास सोसायटीचे चेअरमन संजय घोलप, माजी पंचायत समिती सदस्य रमेश चव्हाण, कालगावचे सरपंच सोमनाथ चव्हाण, माजी सरपंच डॉ. शंकरराव पवार, यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष



राजेंद्र चव्हाण सर यांच्या सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी आ.बाळासाहेब पाटील, मानसिंगराव जगदाळे, संगिता साळुंखे,डॉ. शंकरराव पवार ,लालासाहेब पाटील व इतर .

जयसिंगराव जाधव, सचिव दिलीपराव शिंदे, कालगाव सोसायटीचे चेअरमन अण्णा पाटील,कालगाव तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संतोष चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार पाटील पुढे म्हणाले राजेंद्र चव्हाण सर यांनी शिक्षण मंडळ कराडच्या शिस्तप्रिय लाहोटी कन्या प्रशालेत २८ वर्षे ज्ञानदान करून अनेक मुली जगाच्या कानाकोपऱ्यात विविध पदावर जाण्यासाठी मोलाचे योगदान दिले. अशा शिस्तप्रिय शाळेत सरांनी नोकरी केली.

मानसिंगराव जगदाळे म्हणाले एखाद्या घरात शिक्षक असेल तर तो स्वतःच्या घराबरोबर समाज सुधारण्यातही हातभार लावत असतो. संगीता साळुंखे म्हणाल्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम म्हणजे एका डोळ्यात आसू आणि दुसऱ्या डोळ्यात हसू असा असतो समाजात सध्या अराजकता माजली असल्याने गुरूच्या प्रती आदर कमी होताना दिसत आहे . यावेळी डॉ. शंकरराव पवार, प्रा. तात्यासाहेब मोरे ,डी.एन. शिंदे आदींनी मनोगतातून राजेंद्र चव्हाण यांच्या कार्याची माहिती दिली. राजेंद्र चव्हाण सर म्हणाले आजपर्यंत नोकरीबरोबर गावातील सुखदुःखामध्ये समाविष्ट होत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले यापुढे नोकरीतून मुक्त झाल्याने समाजसेवेसाठी तत्पर राहीन. प्रास्ताविक माजी पंचायत समिती सदस्य रमेश चव्हाण यांनी केले.स्वागत दिग्विजय चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन कराड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुधाकर चव्हाण यांनी केले तर आभार श्री समर्थ हायस्कूल कालगावचे मुख्याध्यापक जगन्नाथ कुंभार यांनी मानले.



# नागठाणे महाविद्यालयाच्यावतीने ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन

**नागठाणे/प्रतिनिधी:**

आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज नागठाणे महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे समाधी स्थळ, कोल्हापूर ते आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे ज्ञानज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्य सौ शुभांगीताई गावडे यांच्या हस्ते ज्ञानज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्रशासन एस.एम.गवळी, संस्थेचे सी. ई.ओ.कौस्तुभ गावडे, संस्थेचे आजीव सेवक व कोल्हापूर जिल्हा विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेज कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, संस्थेच्या व्यवस्थापक मंडळ सदस्य डॉ. श्रुती जोशी, संस्थेचे व्यवस्थापन मंडळ सदस्य एस. के. कुंभार यांनी ज्ञानज्योती रॅली साठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ.महेश गायकवाड, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी, शिक्षकेतर स्टाफ, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# आ.अशोक पवार यांची मतदार संघात रखडलेली कामे ठरत आहे डोकेदुखी

**पुणे/प्रतिनिधी:**

शिरूर चे आमदार अशोक पवार यांचे मतदार संघात धर्मपंढरी वढू बुद्रुक ला जोडणारा भीमा नदी वरील पुलाचे काम अती संथ गतीने सुरू असताना वाजेवाडी चे हद्दीत सुरू असलेले रस्त्याचे काम बंद पडलेले पाहायला मिळत आहे.

पिंपळे जगताप, वाजेवाडी, मांजरेवाडी, वढू बुद्रुक, आपटी, करंदी, केंदुर, पाबळ यांची जीवन वहिनी असलेला मुख्य रस्ता रखडलेला असून आमदार अशोक पवार यांचे अकार्यक्षमतेचा पुरावाच तर नाही ना देत अशी मतदार संघात दबक्या आवाजात चर्चा



आहे. या रस्त्याने जात असताना जास्तीत जास्त लोक आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहे.

आचार संहिते चे कारण देत पळवाट शोधणे हा पर्याय नाही. रस्ता रखडलेला असून नक्कीच कोणाचा तरी जीव घेतल्याशिवाय संबधित ठेकेदार काम करणारच नाही का ?
अ‍ॅड. राहुल वाजे
(सामाजिक कार्यकर्ते)

निश्चित पणे हाच रस्ता आमदार अशोक पवार यांचा आमदारकीचा रस्ता तर कापणार नाहीना?

आ. अशोक पवार यांचे कार्यकर्ते वारंवार पाठपुरावा करत असूनही ठेकेदार आमदार साहेबांचा जवळचा असूनही काम का होत नाही. या विभागाचे आमदार आणि खासदार करतात तरी काय निवडणुकीचे आधी हा रस्ता सुस्थित नाही आला तर येणारी विधानसभा दाखून देईन या भागातून लीड कोणाला?

पीडब्ल्यूडी च्या अधिकारी अनिल जाधव साहेब यांच्याशी मी बोलणे केले आहे तरी रस्त्याचे काम अपूर्णच आहे वेळोवेळी फॉलोअप घेऊन काही उपयोग होत नाही पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांना कोणी कॉन्टॅक्टर असेल त्याला ब्लॅक लिस्टला टाकून द्या कोणत्याही वरिष्ठ पुढाऱ्याचा त्याला पाठिंबा जरी असला तरी त्याला ब्लॅक लिस्ट टाका अशी मी मागणी केली आहे..
अमित सोनवणे (भाजपा युवा मोर्चा तालुका सरचिटणीस)

# प्रा तुकाराम ओंबळे यांचे पत्रकार क्षेत्रातील काम मौल्यवान

## बापूसाहेब जाधव

**मेढा/प्रतिनिधी:**

प्राध्यापक तुकाराम ओंबळे यांनी शैक्षणिक सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रात केलेले काम मौल्यवान असून ते युवकांसाठी प्रेरणादायक आहे. असे गौरवोद्गार दैनिक पुढारीचे ब्युरो चीफ हरीश पाटणे यांनी मेढा तालुका जावली येथे काढले. ते प्रा. तुकाराम ओंबळे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त जावली तालुका पत्रकार मित्र, जनसेवा प्रतिष्ठान केडंबे, ग्रामस्थ मंडळ केडंबे व माजी विद्यार्थी यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित प्रा. तुकाराम ओंबळे सत्कार समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी दै. ग्रामोद्धारचे संपादक बापूसाहेब जाधव होते.

श्री हरीश पाटणे पुढे म्हणाले, प्रा. ओंबळे यांनी विविध क्षेत्रात केलेले काम मोठे असून समाजाला ते माहीत होणे आवश्यक आहे. प्राध्यापक ओंबळे यांच्या पत्रकारितेतील कार्यामुळे जावली तालुक्यात पत्रकारांची एक नवीन पिढी तयार झाली. त्यांची निस्पृह, रचनात्मक आणि धडाडीची पत्रकारिता आमच्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगून शेवटी श्री. पाटणे यांनी आजच्या तरूण पत्रकारांनी प्रा. तुकाराम ओंबळे यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे माजी इन्स्पेक्टर विजय सिंह पिसाळ, प्राध्यापक श्रीधर साळुंखे, जीवनधर चव्हाण, डॉक्टर रवींद्र भोसले, बापूराव पार्टे, जगन्नाथ शिंदे, एड. शिवाजीराव मर्ढेकर, आदिनाथ ओंबळे इत्यादी प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त करुन त्यांनी प्रा. तुकाराम ओंबळे यांच्या विविधांगी जीवनकार्याचा गौरव पूर्ण उल्लेख केला.

जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष एकनाथ ओंबळे यांनी प्रास्ताविक भाषणात आपले गुरुवर्य ओंबळे सर यांचे कौटुंबिक जीवन व अध्यापन कौशल्य याविषयी माहिती सांगितली.

प्रारंभी केक कापून शुभेच्छापर गीताच्या स्वरात व टाळ्यांच्या गजरात ओंबळे सरांचा वाढ दिवस संपन्न झाला. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना प्रा. तुकाराम ओंबळे यांनी आपल्या कौटुंबिक जीवनातील तसेच सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील वाटचालीत आलेले बरे वाईट अनुभव सांगितले. तसेच आज अखेर ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार मानले. या वेळी प्रा. ओंबळे यांचे तर्फे जावली तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना प्रत्येकी दोन ग्रंथ भेट देण्यात आले.

याप्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गुरुवर्य आर. एन. काळे, एड.उत्तमराव गोळे, एड. विवेक देशमुख, एड.बाळासाहेब गायकवाड, प्रा.बी. पी. पवार, प्रा.जे.के. अणि के.ए. नलवडे, आर.डी.पवार, रघुनाथ



दिघे, सरपंच महादेव ओंबळे, बंडोपंत ओंबळे, आनंदराव जुनघरे, आनंदराव म्हस्कर, सुनिल जांभळे, सचिन पार्टे, सूर्यकांत देशमुख, सरांची कन्या सौ. गीतांजली निकम, जावई अमित निकम, बोंडारवाडी धरण कृती समितीचे पदाधिकारी, जावली तालुका पत्रकार संघाचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, बेल्हे ता. जुन्नर येथील ओंबळे सरांचे माजी विद्यार्थी इत्यादी मान्यवर, तसेच नातेवाईक, मित्र परिवार व केडंबे ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

पत्रकार सुरेश पार्टे यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. मोहन जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ ओंबळे, मोहन जगताप, सुरेश पार्टे, नारायण शिंगटे, प्रशांत गुजर, संदीप गाडवे, संजय दळवी आदी पत्रकार मित्रांनी परिश्रम घेतले.

## परवानाधारक मद्य विक्रेते, औषध विक्रेते, वाहतूक संघटना, सहकारी बँका व पतसंस्था यांच्यासाठी

# कराड दक्षिण उत्तर निवडणूक प्रशासनातर्फे आदेश पारित

**कराड/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी कराड उत्तर व कराड दक्षिण विधानसभा निवडणूक प्रशासनातर्फे परवानाधारक मद्य विक्रेते, औषध विक्रेते, वाहतूक व्यवसायिक संघटना, सहकारी बँका व पतसंस्था यांच्या प्रतिनिधींची सभा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड येथे आयोजित केली होती.

सभेत कराड उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी विक्रांत चव्हाण, कराड दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी विविध आदेश दिले.




परवानाधारक मद्य विक्रेत्यांनी आपले रोजचे विक्री रेकॉर्ड अद्ययावत राखावे,वेळेचे काटेकोर पालन करावे, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आदेश दिले. औषध विक्रेत्यांनी औषधे नियमाप्रमाणे वितरित करावीत असे आदेश दिले. वाहतूकदार संघटनांनी उपप्रादेशिक वाहन विभागांनी दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करून आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आदेश दिले.

आदर्श आचारसंहितेच्या काळात सहकारी बँका व पतसंस्थांनी आपली रोकड वाहतूक करण्यासाठी उपनिबंधक कार्यालय व निवडणूक प्रशासनाकडून परवाने घ्यावेत, रोकड वाहतूक करणाऱ्या कर्मचारी व चालकांचे ओळखपत्र, वाहन परवाना सोबत असावा असे आदेश दिले.

महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे अन्यथा कठोर कारवाई केली जाईल असे आदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले. सभेस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्पना ढवळे,स्मिता पवार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक बापू डोणे, सहकार विभागाचे उपनिबंधक संजय जाधव, मुख्य लिपिक अर्चना थोरात, सर्व परवानाधारक मद्य व्यवसायिक, केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी,वाहतूक संघटना, सहकारी बँका व पतसंस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये सिव्हिल अभियांत्रिकीतील प्रावीण्य विषयावर विकास संवादाचे आयोजन

**सातारा/प्रतिनिधी:**

यशोदा टेक्निकल कॅम्पस सिव्हिल पॉलिटेक्निक विभागाच्या वतीने यशोदा तांत्रिक कॅम्पस, सातारा येथे अंतिम वर्षाच्या सिव्हिल अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी सिव्हिल अभियांत्रिकीतील प्रावीण्य: टेंडरिंगपासून प्रत्यक्ष प्रकल्पांपर्यंत या विषयावर विकास संवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सुनील संकपाळ उपस्थित होते. ते ओमकार डेव्हलपर्सचे मालक, बिल्डर्स असोसिएशन- वाईचे अध्यक्ष, क्रेडाईचे सदस्य, आणि शासकीय मुल्यांकनकर्ता आहेत.तसेच त्यांची एनएबील ची मान्यता मिळवणारी जिल्ह्यातील एकमेव अशी बांधकाम साहित्य दर्जा तपासणीची लॅब आहे. श्री. संकपाळ यांनी त्यांच्या बांधकाम क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवांद्वारे टेंडरिंग प्रक्रिया, वित्तीय व्यवस्थापन, आणि प्रत्यक्ष बांधकाम प्रकल्पांतील आव्हानांवर सखोल मार्गदर्शन केले. या दरम्यान त्यांनी टेंडर भरताना काय काळजी घ्यावी? त्यासाठी लागणारी कागदपत्रे कोणती ?बांधकामाची गुणवत्ता



टिकवण्यासाठी काय करावे? ग्राहक-केंद्रित बांधकाम प्रकल्प कसे निर्माण करावेत? तसेच बांधकामाचे मूल्यांकन, या क्षेत्रातील वित्तीय आव्हाने व उपाय नवीन तंत्रज्ञान याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. आजचा विद्यार्थी हा उद्यमशील बनावा यासाठी कॉलेज करत असलेल्या प्रयत्नाचे देखील त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्नोत्तरांमध्ये सहभाग घेतला. या संवादातून विद्यार्थ्यांना उद्योगातील नवीन प्रवाह, आधुनिक तंत्रज्ञान आणि भविष्यातील संधी यांबद्दल मौल्यवान माहिती मिळाली.

संस्थापक अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे सर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. प्राचार्य प्रा. प्रवीण गावडे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे कौतुक केले व भविष्यात देखील असे विद्यार्थी पूरक उपक्रम राबवावे असे प्रोत्साहन दिले.विभागप्रमुख प्रा. प्रतिक मतकर, प्रा.पल्लवी काशीद यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा.स्मिता चव्हाण यांनी आभारप्रदर्शन केले. यशोदा तांत्रिक कॅम्पसच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या व विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडून ठेवण्याच्या प्रयत्नांची ही घटना एक ठळक पाऊल ठरली.

# बाळासाहेब सोपान गावडे यांचे निधन

**इस्लामपूर/ प्रतिनिधी:**



राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांचे सेवानिवृत्त स्वीय सहाय्यक बाळासाहेब सोपान गावडे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना सोमवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालविली. त्यांच्या पार्थिवावर कासेगाव (ता.वाळवा) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी मंत्री आ.जयंतराव पाटील व राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी दिर्घकाळ स्वीय सहाय्यक म्हणून काम केले आहे. एक शांत,संयमी आणि विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख होती. ते गावच्या सार्वजनिक क्षेत्रातही सक्रिय होते.

त्यांच्या पश्चात विवाहित दोन मुलगे, मुलगी, पुतण्या, भाऊ परिवार आहे. रक्षा विसर्जन व कार्य विधी बुधवार दि.२३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता कासेगाव येथे होणार आहे. आरआयटीचे प्रा.सचिन गावडे,उद्योजक संग्राम गावडे यांचे वडील,तर डॉ.माणिक गावडे यांचे ते चुलते होत.



# राहमत अँगलो उर्दू हायस्कूल विटामध्ये मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**विटा/प्रतिनिधी:**

आदरणीय विकास राजेश स्वीप नोडल अधिकारी मुंबई तथा गटशिक्षणाधिकारी खानापूर पंचायत समिती विटा यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती कार्यक्रम राहमत अँगलो उर्दू हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आला.

२८६ खानापूर विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत आज राहमत अँगलो उर्दू हायस्कूलमध्ये जनजागृती कार्यक्रम पत्रिकेनुसार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या वेळेला पोस्टर तयार करण्यात आले. व मुलांना सायकल आणण्यासाठी पाचारण करणात आले या रॅलीमध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला तसेच मुला-मुलींनी वक्तृत्व स्पर्धेत तसेच मुला-मुलींनी वक्तृत्व स्पर्धेत ही हिरारीने भाग घेतला. त्याचबरोबर मतदान घोषवाक्य स्पर्धा ही घेण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक खलील मोमीन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे सायकल रॅलीचे नियोजन केलेगेले त्याचबरोबर मतदान का व कशासाठी करायचे एक मत लाख मत मतदान करणे आपला हक्क याविषयीही सविस्तर मार्गदर्शन केले गेले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# सोलापूर शहर मध्य शहर उत्तर शहर दक्षिण विधानसभेसाठी निवडणुक खर्च निरीक्षकाची नियुक्ती

**सोलापूर/प्रतिनिधी:**

सोलापूर शहर मध्य, शहर उत्तर, शहर दक्षिण आणि अक्कलकोट मतदारसंघासाठी निवडणुकीसाठी खर्च निरिक्षक मीना तेजराम श्रीमनलाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता २४८- सोलापूर शहर उत्तर, २४९- सोलापूर शहर मध्य, २५०-अक्कलकोट आणि २५१- दक्षिण सोलापूर मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाकडून मीना तेजराम श्रीमनलाल (भा.रा.से.) यांची खर्च निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

खर्च निवडणूक निरीक्षक मीना तेजराम श्रीमनलाल (भा.रा.से.) यांचे कार्यालय शासकीय विश्रामगृह सोलापूर या ठिकाणी असून निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने कोणालाही भेटायचे किंवा कोणतीही माहिती दयावयाची असल्यास सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत शासकीय विश्रामगृह, सात रस्ता, सोलापूर येथे संपर्क साधावा. तसेच त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९११५२५२५९४ हा असून त्यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधता येईल असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

# राहत्या घरातून एकजण बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:**

राहत्या घरातून एकजण बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २० रोजी परशुराम अर्जुन कुसाळकर रा. लक्ष्मी टेकडी, सदर बाजार सातारा हे घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेले आहेत. अधिक तपास महिला पोलीस नाईक सपकाळ करीत आहेत.

# महिलेच्या विनयभंग प्रकरणी दोनजणांवर गुन्हा

**सातारा/ प्रतिनिधी:**

महिलेच्या विनयभंग प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात दोनजणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अंगावर वाहन का घातले? असा जाब विचारल्याच्या कारणातून चिडून जावून महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी मयुर पवार, राजेंद्र पवार (रा. सहकारनगर, खेड, सातारा) यांच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

**नशिबाची परीक्षा**
मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ९-२-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 270 379 900 | 9 - 3 | 120 490 448 | 97-13-26-85-30 |

**कल्याणम**
उदय-अस्त | सिंगल ३-१-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 238 670 580 | 3 - 6 | 150 240 600 | 34-06-18-75-69 |

**मुंबैम (मेन )**
उदय-अस्त | सिंगल ४-२-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 149 248 680 | 4 - 5 | 140 230 780 | 46-15-20-89-57 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक
मो.नं. ९९७५४७९८२६


# गरीबाच्या मदतीला धावले 'देवदूत' रॉयल नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

अक्कलकोट येथे एका गरीबाच्या मदतीला देवदूत' बनून चक्क रॉयल नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी हे धावून आले आणि जखमी तरुणाला जीवदान मिळाले आहे.. दवाखान्याचा खर्च करण्याची घरची परिस्थिती नव्हती परंतु मिलन दादा यांनी दवाखाना खर्चाची जबाबदारी स्वतःवर घेतली आणि तातडीने उपचार सुरू करायला लावले आणि तरुणाचे प्राण वाचले.

याबाबत ची सविस्तर घटना अशी आहे की, खासबाग गल्लीमध्ये श्री साई समर्थ प्रतिष्ठान चे कार्यकर्ते अनिल तेली यांना अचानक चक्कर येऊन पडले असता प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी त्यांना उपचार करण्यासाठी श्री स्वामी समर्थ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अक्कलकोट येथे घेऊन गेले असता.. मेंदू मध्येरक्त पुरवठाहोणेबंद झाले होते.यानंतर त्यांना तातडीने पुढील उपचार



करण्यासाठी ऍडमिट करण्यात आले.

परंतु हॉस्पिटल चा खर्च ४० ते ५०हजार रुपये येईल असे डॉक्टरांनी सांगितले. उपचार करणे पण महत्वाचे होते कारण अनिल यांच्याच जीवावर त्यांचे पूर्ण कुटुंब निर्भर आहे... ते ड्रायव्हिंग करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते...यांच्या पाठीशी त्यांची आई,पत्नी,दोन लहान मुले आहेत...आणि त्यातच डॉक्टर म्हणाले खर्च करू शकत नसाल तर सोलापूर ग्रामीण हॉस्पिटल ला घेऊन जाऊ शकता...पण ग्रामीण हॉस्पिटल ला उपचार होईल की नाही याची सर्वांना भीती होती... घरची परिस्थिती तर खूप हालाकीची असल्याने काय करावे सुचत नव्हते. दवाखान्यात आम्ही त्याच्या सोबत असल्यामुळे निर्णय घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आमच्यावरच होती. कारण घरात अनिल हाच कर्ता पुरुष आहे आणि त्याच्यावरच हा प्रसंग ओढावला. आई वृद्ध व पत्नी अशिक्षित, ते बिचारे काहीही करू शकत नव्हते. मला पण काहीच सुचत नव्हते. त्यातच आम्हाला देवदूत मिलन दादा कल्याणशेट्टी यांची आठवण झाली ...आणि त्यांना लगेच कॉल करून झालेली पूर्ण हकीकत सांगितली त्यांनी तात्काळ मदतीसाठी होकार दिला आणि मला म्हणाले, 'तूम्ही पेशंटला घेऊन कुठे जाऊन का मी इथेच आहे हे शब्द ऐकून आम्हाला धीर मिळाला.त्यांनी थोडी विचारपूस करून लगेच आम्हाला सूचना केल्या की त्यांना एकडे तुकडे कुठे घेऊन जाऊ नका त्यांच्यावर पूर्णपणे उपचार इथेच होऊ द्या...राहिली खर्चाची गोष्ट काय होईल ते मला कळवा मी स्वतः सर्व खर्च बघतो.

असे म्हंटल्यावर सर्वांना मोठा धिर आला आणि सर्वांच्या तोंडून आपसूकच शब्द बाहेर पडले. आम्हा गरिबांच्या मदतीला खरेच देवदूत धावून आले.


# आज का अंदाज

मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२४

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| दिवाळी गोल्डन जोडी कल्याण बाजार करिता आजच पॉवर जोडी | दिवाळी गोल्डन जोडी मेन बाजार करिता आजच पॉवर जोडी |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २२-२३ ऑक्टोबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२४

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० | २० | ५३ | ८३ |
| | १९ | २९ | ५४ | ८४ |
| | १६ | २६ | ५७ | ८७ |
| | २९० | १५६ | २५८ | २६० |
| | ५६० | ४८० | ७८० | ४५९ |
| | ६७८ | ३९० | ३५७ | ३५० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# कराड उत्तर चा सस्पेन्स अद्याप भाजपकडून कायम

## धक्का तंत्र टाळून सुरक्षित खेळीची रणनीती

**सातारा/प्रतिनिधी:**

भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.या यादीमध्ये त्यांनी सातारा जिल्ह्यातील सातारा कराड दक्षिण व माण या तीन तालुक्यातील उमेदवार जाहीर केले मात्र जोरदार ताकद लावलेल्या कराड उत्तर मतदार संघाची उमेदवारी मात्र अद्याप त्यांनी जाहीर केलेली नाही येथे मनोज घोरपडे, रामकृष्ण वेताळ की धैर्यशील कदम या प्रश्नावर अद्याप वरिष्ठ कार्यकारीणीने निर्णय दिलेला नाही.

फारसे धक्का तंत्र न करता आणि बंडखोरी टाळण्याची रणनीती भाजपने निश्चित करत मोठ्या खुबीने हा सस्पेन्स कायम ठेवला आहे. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पाच दिवसात भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची पहिली यादी रविवारी जाहीर केली होती. हरियाणातील निवडणुकीनंतर भाजप महाराष्ट्रात खराब



कामगिरी असणाऱ्या विद्यमान आमदारांचा पत्ता कट करणार असल्याची चर्चा होती मात्र पक्षाने प्रत्यक्षात धक्कातंत्र कटाक्षाने टाळून पुन्हा जुन्या आमदारांवर विश्वास टाकला आहे हे या यादीवरून स्पष्ट होत आहे.

साताऱ्यात आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले ही भाजपची हुकमी सीट आहे आमदार शिवेंद्रसिंहराजे यांचे सातारा जावली मतदारसंघावर एकहाती वर्चस्व आहे .त्यामुळे महाविकास आघाडीला येथे तगडा उमेदवार कोण द्यायचा हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. भाजपच्या सर्वेक्षणामध्ये सुद्धा साताऱ्याला अनुकूल प्रतिसाद मिळालेला आहे माण खटाव मतदार संघामध्ये सुद्धा भारतीय जनता पार्टीचे हुकमी शिलेदार आमदार जयकुमार गोरे यांनी राष्ट्रवादीला अजूनही बॅकफूटवर ठेवले आहे आमचं ठरलंय म्हणणाऱ्या राष्ट्रवादीच्या डझनभर नेत्यांची फौज शरद पवार यांना भेटायला मुंबईला गेली होती. मात्र त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही . गोरे यांना धोबीपछाड देणारा उमेदवार शरद पवार यांना हवा आहे मात्र गोरे आणि माजी खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी मान खटाव तालुक्यात संघर्ष पूर्ण वातावरण तयार ठेवले आहे राष्ट्रवादीला सुद्धा येथे बरीच तगडी मेहनत घ्यावी लागणार आहे तरीसुद्धा भाजपला गोरे यांच्या इलेक्टिव्ह मेरिट ची पूर्ण कल्पना आहे याशिवाय कराड दक्षिण मध्ये अतुल भोसले यांनी वाढवलेली ताकद लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांनी वाढवलेला मतदानाचा टक्का खासदार उदयनराजे भोसले यांना मिळालेली मतांची आघाडी यामुळे कराड दक्षिण मधून अतुल भोसले यांचे नाव पहिल्या यादीत जाहीर झाले आहे या तीन मतदारसंघांविषयी भाजपला प्रचंड खात्री आहे.

मात्र कराड उत्तर मध्ये कोणताही दगाफटका होऊ नये बंडखोरी होऊ नये याकरता येथे सावध पावले उचलली जात आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वेक्षणामध्ये मनोज घोरपडे हे नाव सध्या हॉट लिस्ट मध्ये आहे तसेच काही दिवसांपूर्वी घोरपडे यांनी खासदार उदयनराजे भोसले यांची विशेष भेट घेतली होती या भेटी मागचा सुप्त अन्वयार्थ म्हणजे पाठबळाचा होता भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी सुद्धा कराड उत्तर क्षेत्रात परिवर्तन यात्रा काढून वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला त्यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी असली तरी आमदारकी मिळवण्याची त्यांची राजकीय आकांक्षा विझलेली नाही. गत निवडणुकीमध्ये भाजपचे दोन्ही उमेदवार समोरासमोर लढले होते त्यामध्ये मनोज घोरपडे अपक्ष होते त्यांच्यातील मत विभागणीचा फायदा राष्ट्रवादीचे आमदार बाळासाहेब पाटील यांना झाला होता यंदाच्या लोकसभा निवडणुकीमध्ये रामकृष्ण वेताळ मनोज घोरपडे व धैर्यशील कदम या ठिकाणी या मतदारसंघात जोर लावत उदयनराजे यांना जास्तीत जास्त आघाडी देण्याचा प्रयत्न केला होता भाजपला सध्या या मतदारसंघात वातावरण चांगले आहे या वातावरण निर्मितीची दखल राष्ट्रवादीचे आमदार बाळासाहेब पाटील यांना घ्यावी लागणार आहे. कराड उत्तर मतदार संघामध्ये काटे की टक्कर होण्याची शक्यता पाहूनच भारतीय जनता पार्टीने कराड उत्तर चा उमेदवार सस्पेन्स मध्ये ठेवला आहे मात्र तिथे घोरपडे यांना संधी दिली जाईल अशी शक्यता वाटत आहे. भारतीय जनता पार्टीने विद्यमान १०५ पैकी ७५ आमदारांना पुन्हा तिकीट देताना ओबीसी मराठा या जाती समीकरणाकडे काटेकोरपणे लक्ष दिले आहे त्या निकषानुसारच येत्या काही दिवसात पुढच्या यादीत घोरपडे यांचे नाव पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही खासदार उदयनराजे भोसले यांचे कट्टर समर्थक कुलदीप शिरसागर यांच्याही नावाची चर्चा समाज माध्यमांवर सुरू झाली आहे. त्यामुळे येथील राजकीय परिस्थिती खूपच रंगतदार बनली आहे.

## शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्याची चौकशी करा

### शहर सुधार परिसर समितीची मागणी

**सातारा / प्रतिनिधी**

शहरातील जीवन प्राधिकरणाद्वारे होणारा पाणी पुरवठा अचानक ऑक्टोंबर १७ पासून म्हणजेच गेल्या तीन दिवसांपासून ते आज अखेर बंद राहिल्यामुळे या प्रकरणाची गुन्हेगारी स्वरुपाविषयी चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी शहर सुधार शहर परिसर समितीने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

निवेदनात, शहरातील नागरिकांना पाणी सेवा मिळणे हे घटनात्मक अधिकरात येते. मानवी हक्क कायदा १९९३ च्या राईट टू फूड अॅण्ड राईट टू वॉटर या अधिकाराचे पालन शासन यंत्रणेने करून नागरिकांचे जीवित हक्क अबाधित ठेवण्याची जबाबदारी यंत्रणेवर आहे. तरी शहरातील व शहर परिसरातील दोन लाख नागरिकांचे पाण्यावाचून हाल होत आहेत. अत्यावश्यक सेवा, अनेक हॉस्पिटल्स रुग्णालये यांना या काळात याचा परिणाम भोगावा लागत आहे. हजारो गरीब नागरिक पाण्यासाठी पायपीट करत आहेत. यासाठी ते मिळेल त्या साधनांचा स्वखर्चाने व विकत घेऊन पाणी मिळवत आहेत. सर्व नागरिकांचा हा आक्रोश असून सुध्दा यंत्रणा काही कारवाई न करता दुर्लक्ष करत आहेत . जीवन प्राधिकरण तांत्रिक कारण सांगून नागरिकांचे हाल करत आहेत.

याप्रकरणी शहर सुधार शहर परिसर समितीच्या वतीने संघटनेचे पदाधिकारी अस्लम तडसरकार, विक्रांत पवार यांनी प्रत्यक्ष जलशुध्दीकरण केंद्र विसावा नाका येथे पाहणीस गेले असता तेथे जीवन प्राधिकरणाचे कंत्राटी अधिकारी उपस्थित होते, ज्यांच्यावर या विषयाची थेट जबाबदारी असलेले संबंधित अभियंता अधिकारी वर्ग हे प्रत्यक्ष भेटले नाहीत, मात्र फोन वरून संपर्क केला असता पाणी पुरवठा बंद असण्याविषयी कोणतीही जबाबदारी घेतली नाही. याविषयी माहिती घेतली असता एमएसईबीने वीज पुरवठा वारंवार खंडित केल्याने पंम्पींग स्टेशनचे कार्य आणि कामकाज गेले तीन महिन्यपासून विस्कळीत होत असल्याची माहिती मिळाली. याचा परिणाम म्हणून वारंवार पाइप फुटत आहेत असे सांगण्यात आले. एकूणच जीवन प्राधिकरण व एमएसईबी यांच्या कारभारातील तांत्रिक व व्यवस्थापन दोष निश्चित करून हा प्रकार मानवी हक्कविषयी संवेदनशील असल्याने व माणसाच्या जीवनाशी संबंधित असल्याने त्याची गुन्हेगारी स्वरुपाची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित करून गुन्हे दाखल व्हावेत. येथून पुढे विनाविलंब अखंड पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहेत. निवेदनावर अस्लम तडसरकर, विक्रांत पवार, विजय निकम, शिवाजी राऊत यांच्या सहया आहेत.

## पाझर तलावात बुडालेला जयदीप दुसऱ्या दिवशीही सापडला नाही

### महाबळेश्वर ट्रेकर्स देताहेत शर्थीची झुंज

**पांचगणी/प्रतिनिधी:**

मित्रांसमवेत भिलार पाझर तलावात पोहायला गेलेल्या जयदीप मुकुंद भिलारे (वय २६, रा. भिलार, ता. महाबळेश्वर) हा दुपारी साडेचारच्या सुमारास बुडाल्याने गावात एकच खळबळ उडाली. अथक परिश्रम घेऊनही दुसऱ्या दिवशीही जयदिपचा तलावात शोध लागला नाही. कुटुंबियांबरोबर अख्खा गाव तलावाबाहेर जयदिप साठी डोळे लाऊन बसला आहे.

काल रविवारी (दि.२०) दुपारी साडेचारच्या सुमारास भिलारमधील पाझर तलावाकडे चार पाच मित्र मिळून गेले होते. यावेळी काहीजण पाझर तलावात पोहण्यासाठी उतरली. तेव्हा जयदीपलाही पोहण्याचा मोह आवरला नाही. त्याला चांगले पोहता येत नव्हते. तो पाण्यात उतरल्यानंतर पोहत काही अंतर पुढे गेला. मात्र, त्याला दम लागला. त्याला परत सुद्धा येता आले नाही. अखेर गटांगळ्या खात तो पाण्यात बुडाला. तो वाचवा वाचवा म्हणून मित्रांना बोलावत होता.

त्याच्या मित्रांच्या हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर त्यांनी आरडाओरड केली. परंतु तो दिसेनासा झाला. त्यानंतर मित्रांनी याबाबत माहिती दिली. पांचगणी पोलिसांनाही याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसही तातडीने घटनास्थळी आले.यावेळी गावातील मुलांनी तलावात उतरून शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. महाबळेश्वर ट्रेकर्स रेस्क्यू टीमच्या आणि पांचगणीतील ऐस. ओ. ऐस. टीमच्या जवानांनी रात्री उशिरा सात वाजता शोध मोहीम सुरू केली परंतु लाईटच्या उजेडात काहीही यश आलें नाहीं. त्यामुळे ही मोहीम रात्री उशिरा थांबवण्यात आली.

त्यानंतर याच जवानांनी आज सकाळी ही मोहीम सुरू केली पाणबुडी आणली त्यांनीही सकाळपासून तब्बल १२ तास शोध मोहीम राबवली तरीसुद्धा



भिलार : अशा पद्धतीने मोहीम राबवूनही जयदीप सापडला नाही (रविकांत बेलोशे)

जयदीप सापडू शकला नाही. त्यामुळे हतबल झालेल्या या जवानांनी आजही दुसऱ्या दिवशीची मोहीम, ग्रामस्थ आणि युवकांनी थांबवली.

जयदिपचा आजही थांगपत्ता लागला नसल्याने कुटुंबीयही दुःखाच्या सागरात बुडाले आहेत. उद्या सकाळी ही मोहीम पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे यावेळी ग्रामस्थांनी सांगितले.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळाचा ब्राह्मण समाजाला निश्चित फायदा: :कॅप्टन आशिष दामले

**कराड/प्रतिनिधी:-**

काही लोकांनी ब्राह्मण समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. अशांना महामंडळाचे अध्यक्षपद न मिळाल्याने वाईट वाटले असेल. तरी त्यांची नाराजी दूर करू तसेच ब्राह्मण समाज एकसंघ आहे. या महामंडळाच्या उभारणीचा राज्यातील ब्राह्मण समाजातील दरी कमी करण्यासाठी निश्चितच फायदा होईल, असा विश्वास परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांनी व्यक्त केला.

परशुराम आर्थिक विकास महामंडळ ब्राह्मण समाजासाठी नुकतेच महायुती सरकारने स्थापन केले. या महामंडळाच्या अध्यक्षपदी आशिष दामले यांची निवड करण्यात आली. त्यानिमित्त कराड येथे शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाधीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ प्रदेश उपाध्यक्षा सोनल ताई भोसेकर, मुकुंद उर्फ शार्दुल चरेगावकर, सुरेन्द्र काळे, संजय भोसेकर, घनश्याम उर्फ श्री पेंढारकर,



स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण करताना परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले समवेत सोनल ताई भोसेकर, मुकुंद उर्फ शार्दुल चरेगावकर, सुरेन्द्र काळे, संजय भोसेकर, घनश्याम उर्फ श्री पेंढारकर व इतर मान्यवर

ओंकार आपटे, प्रशांत कुलकर्णी, अँड. मिलिंद कुलकर्णी, शशांक शेंडे, अमित बुधकर, मनोज आचार्य, नितीन शाळीग्राम, प्रशांत कुलकर्णी रमेश कुलकर्णी, पी.डी. कुलकर्णी, गौरीताई निलाखे, विनिता पेंढारकर, शरयु माटे सुषमा काळे, अनघा कुलकर्णी, विशाखा कित्तूर आदी उपस्थित होत्या.

आशिष दामले म्हणाले, परशुराम महामंडळाकडून आर्थिक दुर्बल घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. या महामंडळाच्या उभारणीचा राज्यातील ब्राह्मण समाजाला निश्चितच फायदा होईल. या निर्णयामुळे आमच्या समाजात आनंदी वातावरण असून ब्राह्मणसह इतर समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

## शत्रुला बळ देणारी फंदफितुरी

### रक्तातील नात्यांची रुंदावती दरी

**चाफळ/रघुनाथ थोरात:**

प्रतिस्पर्धी, शत्रूला सामील झालेल्या अपप्रवृत्तीला फितुर म्हणतात.फितुरी विश्वासघातकी असण्याबरोबरच शत्रूला बळ देणारी ठरते. त्यास फंदफितुरी असेही संबोधतात. या ठिकाणी फंद हा शब्द गळ्याभोवती आवळलेला फास या अर्थी वापरण्यात आला आहे. या दगाबाज फितुरांमुळे प्रसंगी दारूण पराभवाचा देखील सामना करावा लागतो. विशेष करून हे फितुर जर स्वकीय असतील तर मात्र परिस्थितीची दाहकता भयावह अशीच असते.

आपल्याच रक्तातील असणाऱ्या परंतु, शत्रूला जाऊन मिळालेल्यांना रक्तातील परके फंदफितुर म्हटले तर वावगे ठरणार नाही. थोड्याशा अंतर्गत मतभेदांमुळे नाराज होऊन प्रतिस्पर्ध्यांशी हात मिळवणी करीत त्यांच्या गोटात सामील होऊन स्वकीयांचे,रक्तातील नात्याचे मानसिक खच्चीकरण, अध:पतन करण्याचे काम हे घरभेदी अविरतपणे करीत असतात.परंतु, हे सर्व करत असताना नैतिकता, मानवी मूल्ये, नीतिमूल्ये सर्व काही आपण पायदळी तुडवीत आहोत याचा पूर्णपणे विसर पडल्याने रक्ताच्या नात्यांमधील दरी अधिकच रूंदावत जाते. जेव्हा बहिणीवर एखादे संकट येते तेव्हा



काही कारणांमुळे आपल्याशी अबोला धरलेला आपल्या रक्ताचा सख्खा भाऊच आपल्या मदतीला धावून येतो तर जोडलेला भाऊ कुठल्या कुठे गायब होतो हे वास्तव आहे.

आजच्या घडीला ज्याच्याकडे जिव्हाळा, प्रेम, आत्मीयता जपणाऱ्या समृद्ध नात्यांचे भांडार आहे तोच अधिक श्रीमंत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. परंतु, फक्त काही अंतर्गत मतभेदांचा राग डोक्यात ठेवून आपल्याच रक्तातील व्यक्तीची काहीही करून जिरवायचीच ह्या सुडबुद्धीने पेटून उठलेल्या घरभेद्याला सत्य-असत्य, न्याय-अन्याय, नैतिक- अनैतिक यातील फरक कोण समजावून सांगणार?आपले आजी-आजोबा, आई-वडील,भाऊ पर्यायाने संपूर्ण कुटुंबावर अन्याय केलेल्या अपप्रवृत्तीला, शत्रूला सामील होऊन संपूर्ण कुळाचे केलेले अध:पतन कधीही भरून न येण्याजोगे असून पूर्वजांच्या आत्म्यास परमोच्च वेदनादायी आहे असेच म्हणावे लागेल..!

### रक्ताचे भरीव तर जोडलेले तकलादुच

रक्ताचे नाते हे अखंड भरीव असते. तर जोडलेले हे दिलेल्या जोडामुळे कमजोर,तकलादुच राहते हे संकटसमयी कळते.कारण जेव्हा संकट येते ना..तेव्हा रक्ताचीच नाती धावून येतात हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. ..!

## फलटण-कोरेगाव विधानसभा मतदारसंघात माजी खासदार घोषित भाजप उमेदवाराचा पत्ता कट?

**फलटण/प्रतिनिधी:-**

मंगळवार दिनांक १५ ऑक्टोंबर रोजी दुपारी निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेचा बिगुल वाजवला आहे. मंगळवारी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत महाराष्ट्र राज्यात आचार संहिता जाहीर केली आहे.

शनिवारी दिनांक २० ऑक्टोंबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील कराड दक्षिण मधून डॉ.अतुल भोसले, सातारा मधून विद्यमान आमदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, तर माण मधून जयकुमार गोरे यांना पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

फलटण -कोरेगाव विधानसभेसाठी भाजप कडून इच्छुक असलेले सचिन कांबळे यांचे पहिल्या यादीत नाव न आल्याने माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

२०१४ मध्ये दिगंबर आगवणे यांनी शेतकरी संघटनेत प्रवेश केला होता.व दिगंबर आगवणे हे शेतकरी संघटनेच्या तिकिटावर निवडणूक लढवणार होते.मात्र एका रात्रीत दिगंबर आगवणे यांनी शेतकरी संघटनेचा राजीनामा देत रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी काँग्रेसच्या तिकिटावर दिगंबर आगवणे यांना उमेदवारी देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार दिपक चव्हाण यांच्या विरोधात निवडणूक लढविली होती.

त्यानंतर २०१९ मध्ये त्यांचा रणजितसिंह नाईक निंबाळकर हे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार झाल्यानंतर त्यांनी दिगंबर आगवणे यांना भाजप पक्षाकडून फलटण-कोरेगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर केली.मात्र त्यावेळी सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार दिपक चव्हाण यांनी दिगंबर आगवणे यांचा पराभव केला होता.

आचार संहिता जाहीर झाल्यापासून फलटण तालुक्यातील राजकारण तापू लागले आहे.

सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या फलटण -कोरेगाव विधानसभा मतदारसंघांत चांगल्याच घडामोडी फलटण मध्ये घडल्या गेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आ.दीपक चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर आणि संपूर्ण राजे गट यांनी सोमवारी १४ ऑक्टोंबर रोजी उपमुख्यमंत्री अजितदादांची साथ सोडत खा शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करीत हाती तुतारी घेतली.

गेल्या काही दिवसांपुर्वी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजितदादा पवार यांनी फलटण -कोरेगाव विधानसभा मतदारसंघांचे विद्यमान आमदार दिपक चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पहिली उमेदवारी जाहीर केली होती.

मात्र काही दिवसांत फलटण - कोरेगाव विधानसभा मतदारसंघांचे आमदार दिपक चव्हाण यांनी अजित पवार यांनी दिलेल्या उमेदवारीला लाथ मारुन शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश केला आहे.

त्यानंतर माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सोमवारी दिनांक १४ ऑक्टोंबर रोजी फलटण शहरातील गजानन चौकात जाहीर सभा घेतली होती.व भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सचिन कांबळे यांना जाहीर केले होते.

फलटण -कोरेगाव विधानसभा मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ही उमेदवारीची जागा लढवण्यात येत आहे.राष्ट्रवादी क्रांग्रेस अजित पवार गटाला ही जागा सुटणार असल्याची चर्चा सध्या चालू आहे.

मात्र काही दिवस उलटताच भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली.पहिल्या यादीत नाव न आल्याने सचिन कांबळे यांचा भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी उमेदवारीचा पत्ता कट केला असल्याची चर्चा फलटण-कोरेगाव विधानसभा मतदारसंघात चालू आहे.

— पान १ वरुन —

## कराड दक्षिण मतदारसंघात...

राज्यातून गुजरातला नेले. हे राज्य सरकारचे अपयश आहे. मुंबईचे आर्थिक विकास केंद्र गुजरातला पळवले. कराड - चिपळूण रेल्वे मार्गाचे सुरेश प्रभूंच्या हस्ते भूमिपूजन झाले होते. त्या प्रकल्पाचा निधी मोदींनी बुलेट ट्रेनला वळवला. यातून मोदी महाराष्ट्राचा द्वेष करत असल्याचे दिसते.

ते म्हणाले, दिल्लीत बसलेले मोदी, शहा व अदानींनी नकळत मुंबई हातात घेतली आहे. मी मुख्यमंत्री असताना पालघर जिल्हा निर्माण केला. त्या जिल्ह्यात होणारी मरीन अकॅडमी मोदींनी द्वारकेला पळवली. त्यावेळेच्या राज्यातील भाजपच्या नेत्यांनी त्यांना विरोध केला नाही.

ते म्हणाले, राज्याच्या महायुती सरकारने सरकारी मालमत्ता उद्योगपतींच्या घशात घातल्या आहेत. याबाबत आम्ही आवाज उठवला तर राज्याच्या मंत्र्यांनी श्वेतपत्रिका काढतो म्हणून सांगितले. आज ती श्वेतपत्रिका कुठे आहे, असा सवाल करत बोगस टेंडर काढून केवळ विकासाची पोस्टरबाजी सुरू आहे. या सर्व प्रकारांची आमचे सरकार आल्यानंतर चौकशी करणार आहे.

ते म्हणाले, ही निवडणूक राज्याच्या भवितव्याची आहे. भाजपचे सरकार आपल्या डोक्यावर घ्यायचे आहे का, पुन्हा वर्णव्यवस्था अंगावर लादून घेणार आहोत का, याचा गांभीर्याने विचार करा. योग्य निर्णय घेतला, तर विकास होतो. याचे उत्तम उदाहरण मलकापूर शहर आहे. विकासाचा द्रोह करणाऱ्या लोकांनी मलकापूरच्या विकासाला विरोध केला होता. यशवंतराव चव्हाण यांनी कराडला विमानतळ आणले. असे सांगून ते पुढे म्हणाले, कराडच्या विकासाच्या व्हिजनमध्ये सहभागी व्हा. दिल्लीमध्ये काम करत असताना मी जग आणि अनेक राज्यांचा विकास जवळून बघितला आहे. त्या विचारातून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, खंडकरी शेतकऱ्यांना शेती परत केली. १०८ रुग्णवाहिका आणली. या योजनांची नावे बदलून त्या भाजपने सुरू ठेवल्या आहेत.

ते म्हणाले, कर्नाटक राज्यात काँग्रेसने महिलांसाठी गृहलक्ष्मी योजना तर तेलंगणा राज्यात महालक्ष्मी योजना आणली. महाराष्ट्राला एक नंबरवर नेण्याचा आमचा विचार आहे. त्याच विचारातून आमच्या आघाडी सरकारच्या जाहीरनाम्यात लाडकी बहिण योजनेची रक्कम वाढवून प्रतीमहा दोन हजार रुपये करणार असून, महिलांना सक्षम करण्याचा आमचा यामागे संकल्प आहे.

अॅड. उदयसिंह पाटील - उंडाळकर म्हणाले, देशात प्रचंड महागाई वाढली आहे. जाती - जातीत तेढ निर्माण केला जात आहे. आरक्षणावरून विभागणी केली जात आहे. या सर्व प्रक्रियेतून विशिष्ठ विचाराचे सरकार आणण्याचा डाव आहे. ही परिस्थिती निर्माण करण्यात बिघडवणारी शक्ती काम करत आहे. या प्रतीगामी शक्ती आपल्या - आपल्यात तेढ निर्माण करत आहेत.

## शहिद जवान अमर पवार...

रस्त्याने मिटकॉनच्या मैदानात आल्यानंतर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. सैन्यदलाच्यावतीने मानवंदना दिल्यानंतर भडाग्नी देण्यात आला.

याप्रसंगी आ.मकरंद पाटील,जेष्ठ नेते बकाजीराव पाटील, शंकरराव गाढवे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उदय कबुले,माजी उपाध्यक्ष नितिन भरगुडे- पाटील, पुरुषोत्तम जाधव, प्रदिप माने, विराज शिंदे,खंडाळ्याचे तहसिलदार अजित पाटील,पोलीस निरीक्षक सुनिल शेळके,यांच्यासह जिल्ह्यातील नागरिक तसेच ५३ बटालियनचे पथक,पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## शिवसेना-काँग्रेस वादावर..

शरद पवारांनी काँग्रेस हायकमांडशी बोलून या वादावर मध्यस्थी केल्याची माहिती आहे. तर, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी देखील शरद पवारांना ठाकरे गटाच्या भूमिकेसंदर्भात माहिती दिली. त्यानंतर शरद पवारांचा निरोप घेऊन जयंत पाटील मातोश्रीवर गेले होते. शरद पवार आणि काँग्रेसमध्ये झालेल्या बैठकीची माहिती त्यांनी उद्धव ठाकरेंना दिली. त्यामुळे कुठल्याही प्रकारे महाविकास आघाडीच्या जागा वाटपात अडचण निर्माण न करता तातडीने हा गुंता सोडवण्याचा विचार महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे.

## विटा येथील नगरसेवक यांना मानाचा तुरा

### फिरोज भैय्या तांबोळीकडे मोठी जबाबदारी: शासन मान्य संघटना नियुक्तीपत्र

**विटा/प्रतिनिधी:**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा नगरपालिका माजी आरोग्य सभापती व सामाजिक कार्यकर्ते कोंविड योद्धा व राजकीय व सामाजिक क्षेत्रात कायम अग्रेसर असणारे जनतेच्या मनामध्ये घर केलेले नगरसेवक फिरोज (भैय्या तांबोळी) यांच्या कामाचे स्वरूप व कौतुक करत एक मोठी जबाबदारीही देण्यात आली आहे.

ती जबाबदारी म्हणजे, ऑल इंडिया मुस्लीम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशनची संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष इकबाल अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय उपाध्यक्ष काशिम मुल्ला व सांगली जिल्हा अध्यक्ष फिरोज पठाण यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय मेळावा घेण्यात आला होता. हा जिल्हास्तरीय मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या मेळाव्यात ऑल इंडिया मुस्लीम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशनच्या अध्यक्ष व खानापूर तालुका या पदी फिरोज भैय्या तांबोळी यांची या बैठकीत निवड करण्यात आली. या बैठकीत फिरोज



ताबोळी यांना एक जबाबदार व्यक्तिमत्व व पद लक्षात घेता त्यांना ऑर्गनायझेशनच्या नियम व धोरणानुसार आपण संपूर्ण विभागावर मीटिंग घेणे हे जबाबदारी व शिफारस पत्र देणे. समाजामध्ये शैक्षणिक. सामाजिक, राजकीय, आर्थिक व ओ.बी.सी. इत्यादी बाबींमध्ये प्रबोधन व मार्गदर्शन करणे. त्यांच्या अडचणी बाबत पाठपुरावा करणे. इतर कामाची महत्वपूर्ण जबाबदारी असे अनेक जबाबदाऱ्या पार करण्याचे कामकाज सामाजिक कार्यकर्ते फिरोज भैय्या तांबोळी यांच्या कडे ऑल इंडिया मुस्लीम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशने दिल्याने तसे राष्ट्रीय अध्यक्ष इकबाल अन्सारी, सागली जिल्हा अध्यक्ष फिरोज पठाण यांनी फिरोज (भैय्या )तांबोळी यांना सर्व जबाबदारी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या बैठकीत नियुक्तीपत्र शासनमान्य संघटना हे पत्र देण्यात आले.

या वेळी फिरोज भैया समर्थकांनी विटा शहरात फटाक्याची आतिषबाजी व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत पुष्पगुच्छ देऊन सर्वांनी त्यांचे या दिलेल्या जबाबदारी व कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत सत्कार केला.

## नेटकऱ्यानो सावधान

### समाज माध्यमावर राहणार निवडणूक प्रशासनाची पाळत

**कराड/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबरपासून भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशाने आदर्श आचारसंहितेचे अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

सध्या निवडणूक प्रचारासाठी व्हाट्सअप,फेसबुक इंस्टाग्राम, इत्यादी समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.बल्क मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा सुद्धा वापर केला जातो. म्हणून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगातर्फे मीडिया प्रमानान आणि देखरेख समिती राज्य, जिल्हा व प्रत्येक विधानसभा मतदार संघस्तरावर गठीत करण्यात आलेली आहे.या समितीतर्फे सर्व समाज माध्यमांच्यावर पाळत ठेवली जाणार आहे.राष्ट्राची एकता,अखंडता आणि सार्वभौमत्व प्रभावित करणारी कोणतीही गोष्ट, इतर देशांवर टीका, धर्म किंवा समुदायावर हल्ला, हिंसाचाराला उत्तेजन, न्यायालयाचा अपमान करणारी कोणतीही गोष्ट, राष्ट्रपती किंवा न्यायपालिकेच्या सचोटी विरुद्ध आक्षेप, कोणत्याही व्यक्तीच्या नावाने कोणतीही टीका किंवा बदनामीकारक मजकूर, व्यक्तींच्या वक्तव्यांचे जोडून तोडून तयार केलेले व्हिडिओ, मतदान प्रक्रियेतील गुप्ततेचा भंग होईल अशा प्रकारचे फोटो व व्हिडिओ, निवडणूक निकालांचे अंदाज, मतदान प्रक्रियेविषयी विविध गैरसमज पसरवणे इत्यादी बाबी जर समाज माध्यमांच्यावर संदेश, फोटो किंवा छायाचित्रांच्या रूपाने प्रसिद्ध केल्या तर या समितीतर्फे संबंधित व्यक्ती किंवा समाज माध्यमांच्या ग्रुपचे डमिन यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील.

त्यामुळे सर्व जागरूक नागरिकांनी याबाबत दक्ष रहावे.समाज माध्यमांच्या ग्रुप डमिनने ओन्ली एडमिन असे आपल्या ग्रुपचे सेटिंग करून घ्यावे.सर्वांना समान संधी, भयमुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी व संभाव्य निवडणुक प्रक्रियेशी संबंधित गुन्हे टाळण्यासाठी समाज माध्यमांचा जबाबदारीने उपयोग करावा असे आदेश कराड उत्तर व दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी विक्रांत चव्हाण व अतुल म्हेत्रे यांनी पारित केले आहेत.